प्रेस रिलीज

**महाराष्ट्राचा ऊर्जा पट्टा — चंद्रपूर-नागपूर-यवतमाळ क्षेत्र — ३.४ लाख रोजगार आणि ₹५.४ लाख कोटींच्या हरित गुंतवणुकीसाठी आणि प्रादेशिक GDP मध्ये ४% च्या वाढीसाठी सक्षम: iFOREST च्या विभागीय जस्ट ट्रान्झिशन (न्याय्य संक्रमण) गुंतवणूक आराखड्याचे उद्घाटन**

- iFOREST ने चंद्रपूर-नागपूर-यवतमाळ (CNY) प्रदेशासाठी भारताचा पहिला 'प्रादेशिक न्याय्य संक्रमण गुंतवणूक योजना' जाहीर केला
- हा चंद्रपूर-नागपूर-यवतमाळ (CNY) प्रदेश महाराष्ट्रातील १००% कोळसा उत्पादन आणि ५०% कोळसा आधारित वीजनिर्मितीचे केंद्र आहे.
- पुढील दशकात कोळसा स्रोत संपुष्टात येण्यामुळे येथील कोळसा उत्पादन ५०% कमी होणार असून, बंद पडलेली आणि सेवानिवृत्त होणारी कोळसा खाणे पुनर्वापरल्यास हा प्रदेश महाराष्ट्राचे हरित ऊर्जा आणि औद्योगिक केंद्र बनू शकतो.
- १० वर्षांच्या योजनेत तीन आर्थिक विकास केंद्रे (भद्रावती-वाणी, राजुरा-चंद्रपूर आणि उमरे) प्रामुख्याने नमूद करण्यात अली आहेत, जिथे ६,००० हेक्टर कोळसा खाण जमीन हरित ऊर्जा आणि औद्योगिक हब्समध्ये रूपांतरित केली जाऊ शकते.
- चंद्रपूर-नागपूर-यवतमाळ (CNY) प्रदेशात ३७ गिगावॉट्स सौर ऊर्जा निर्मितीची क्षमता आहे – ही सर्वात जास्त सौर क्षमता आहे.
- जमीन पुनर्वापर आणि पुनर्विकासासाठी लागणारी ₹३३,४०० कोटी ची गुंतवणूक, सार्वजनिक गुंतवणूक, कोळसा कंपन्या आणि वीज उपयुक्तता कंपन्या यांच्याकडून उपलब्ध होऊ शकते.

दिनांक २५ जून २०२५, मुंबई: भारताच्या स्वच्छ ऊर्जा भविष्याची दिशा ठरवताना, पर्यावरण विषयक थिंक टॅंक iFOREST ने महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने 'जस्ट ट्रान्झिशन गुंतवणूक आराखडा' तयार केला आहे. हा आराखडा महाराष्ट्राच्या कोळसा व ऊर्जा केंद्र असलेल्या चंद्रपूर-नागपूर-यवतमाळ (CNY) विभागांवर केंद्रित आहे. मुंबईत 'महाराष्ट्रातील हरित विकास व समावेशक हवामान कृतीसाठी जस्ट ट्रान्झिशन' या परिषदेच्या निमित्ताने याचे अनावरण करण्यात आले.

चंद्रपूर-नागपूर-यवतमाळ (CNY) क्षेत्र हे महाराष्ट्राच्या १००% कोळसा उत्पादनासाठी आणि ५०% कोळसा आधारित उष्णता ऊर्जा उत्पादनासाठी जबाबदार आहे. २०३५ पर्यंत, जुन्या कोळसा खाणी बंद आणि जुनी उष्णता ऊर्जा केंद्रे सेवानिवृत्त केल्यामुळे,कोळसा उत्पादनात ५०% तर कोळसा आधारित ऊर्जा क्षमतेमध्ये २३% ची घट होण्याची अपेक्षा आहे. कोळसा आधारित उद्योगांच्या हरित संक्रमणामुळे (जस्ट ट्रान्झिशन), ३.५ लक्ष उपजीविका आणि १३.७% सकल देशांतर्गत उत्पादन सुरक्षित करण्याची संधी महाराष्ट्र राज्याला मिळालेली आहे.

महाराष्ट्र सरकारच्या मुख्य सचिव श्रीमती सुजाता सौनिक यांनी उद्घाटनात्मक व्हिडिओ संदेश देताना म्हटले, "अहवाल सादरीकरण आणि या संवादासाठी iFOREST संस्थेचे मी कौतुक करते. जस्ट ट्रान्झिशन साठी, कोळसा वापर कमी करण्यासोबतच, हरित विकासासाठी नवीन मार्ग शोधणे आणि हा बदल सर्वसमावेशक आणि न्याय्य असल्याची खात्री करणेही आवश्यक आहे. नूतनकरणीय ऊर्जा प्रकल्प आणि हरित औद्योगिक क्लस्टरच्या विकासासाठी गुंतवणूक आकर्षित करणे हे आपले लक्ष्य असावे. विद्युत निर्भर वैयक्तिक आणि व्यावसायिक वाहतुकीसाठी विद्युतीकरण

वाढवणेही आवश्यक आहे. हरित वित्त आणि नाविन्यता यांना प्रोत्साहन देणारी धोरणे या संक्रमणाला गती देतील. जलवायू सुसह्यतेसाठी आणि शाश्वततेसाठी प्रगत धोरणे राबवण्यात महाराष्ट्र नेहमीच अग्रगण्य राज्य राहिले आहे".

श्री प्रवीण परदेशी , मुख्य आर्थिक सल्लागार, मुख्यमंत्री कार्यालय, आणि मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन (MITRA) नियोजन विभाग, महाराष्ट्र, यांनीही आराखडा उद्घाटन कार्यक्रमात आपले विचार मांडले. ते म्हणाले, "महाराष्ट्रातील ४०% ऊर्जा शेती सिंचनासाठी वापरली जाते. या क्षेत्रामध्ये, सौर ऊर्जेचा वापर जास्तीत जास्त करण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे प्रयत्न कौतुकास्पद आहेत. अशा प्रकारे, पारंपारिक ऊर्जा स्त्रोतांपासून हरित संक्रमणाकडे वाटचाल करण्यासाठी ऊर्जा वर्तन आणि वर्तन लक्ष धोरणांचा वापर करणे आवश्यक आहे".

iFOREST चे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) श्री. चंद्र भूषण म्हणाले, "हा जस्ट ट्रान्झिशन गुंतवणूक आराखडा कोळसा अर्थव्यवस्थेतील संकटाला हरित विकासाच्या संधीमध्ये रूपांतरित करणारी एक क्रियाशील योजना आहे. हा आराखडा आर्थिक केंद्रे, अक्षय ऊर्जा आणि गुंतवणुकीचे पर्याय यांच्यावर लक्ष केंद्रित करून, संस्थात्मक रचनेद्वारे दीर्घकालीन सर्व समावेशक विकासाची दिशा निर्देशित करतो. महाराष्ट्र राज्य, देश पातळीवरील जस्ट ट्रान्झिशन चे नेतृत्व करेल आणि हा जस्ट ट्रान्झिशन गुंतवणूक आराखडा त्या दिशेने उचललेले एक ठोस पाउल आहे. हा १० वर्षाचा (२०२५-२०३५) गुंतवणूक आराखडा, इंधन - अवलंबित सामाजिक घटकांना सोबत घेऊन भारताच्या लो-कार्बन अर्थव्यवस्थेकडे जाण्यासाठीचा एक दिशा निर्देशक आहे".

योजनेत गुंतवणुकीबरोबरच ₹३३,४०० कोटींचे महत्त्वाचे 'न्याय्य संक्रमणावरील खर्च'ही निर्देशित केले आहेत, ज्यासाठी सार्वजनिक गुंतवणूक, कोळसा खाण कंपन्या आणि वीज उपयुक्तता संस्थांकडून आर्थिक सहभाग आवश्यक आहे. या खर्चामध्ये प्रामुख्याने जमीन पुनर्प्राप्ती आणि पुनर्वापर (बंद पडलेल्या कोळसा खाणीच्या जमिनीचे हरित ऊर्जा आणि औद्योगिक हब्समध्ये रूपांतर), कामगारांचे कौशल्यवर्धन (कोळसा क्षेत्रातील कामगारांना हरित रोजगारांसाठी प्रशिक्षण), क्षमतावर्धन (स्थानिक संस्था आणि समुदायांची सक्षमीकरण) आणि संस्थात्मक सुदृढीकरण (नवीन नियोजन आणि अंमलबजावणी संस्थांचे बळकटीकरण) या घटकांचा समावेश आहे. हे सर्व उपाय प्रदेशाला कोळशावरच्या अवलंबनापासून हळूहळू दूर जाताना शाश्वत आणि समावेशक विकासाच्या मार्गावर नेण्यासाठी महत्त्वाचे आहेत.

आराखड्या मध्ये यशस्वी अंमलबजावणीसाठी iFOREST ने राज्यस्तरीय धोरण आणि सशक्त प्रशासन व्यवस्था विकसित करण्याची शिफारस केली आहे. यामध्ये मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समिती, कार्यकारी संस्था, न्याय्य संक्रमण कार्यालय, जिल्हा स्तरीय अंमलबजावणी कक्ष, तसेच हरित वित्त जमाव करण्यासाठी एक विशेष हेतू संस्था (SPV) यांचा समावेश आहे. याशिवाय, खाजगी क्षेत्र आणि आर्थिक संस्थांनी भांडवल उभारणे, हरित मूल्य साखळ्या तयार करणे आणि औद्योगिक गुंतवणुकीला चालना देणे यासाठी विशिष्ट भूमिका निश्चित केल्या आहेत. ही संपूर्ण रचना प्रदेशातील हरित संक्रमणास गती देण्यासाठी आवश्यक आहे.

अहवाल सादरीकरण आणि परिसंवादात प्रमुख सरकारी अधिकारी, उद्योग प्रतिनिधी आणि आर्थिक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांची सक्रिय सहभागिता लक्षात आली. यामध्ये श्री प्रशांत गिरबाणे (महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे महासंचालक आणि प्रमुख), श्री जय प्रकाश द्विवेदी (वेस्टर्न कोल फील्ड्स लिमिटेडचे चेरमन आणि व्यवस्थापकीय संचालक), श्री अभिजित घोरपडे (महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण आणि हवामान बदल विभागातील राज्य हवामान कृती सेलचे संचालक), श्री अमित कुमार खंडेलवाल (स्टेट बँक ऑफ इंडियाचे उप महाप्रबंधक) तसेच इतर अनेक विशिष्ट पाहुण्यांनी यामध्ये भाग घेतला.

iFOREST विषयी

इंटरनॅशनल फोरम फॉर एन्व्हायरन्मेंट, सस्टेनेबिलिटी अँड टेक्नॉलॉजी (iFOREST) ही एक स्वतंत्र, ना-नफा संस्था आहे, जी भारतातील पर्यावरण व विकासविषयक आव्हानांवर संशोधन व नवोन्मेषात्मक उपाय शोधण्यासाठी कार्य करते.

अधिक माहितीसाठी भेट द्या: https://iforest.global

संपर्क
श्रीया मोहन
संपर्क प्रमुख | iFOREST
+91 7042144726 | shriya@iforest.global